ग्रंथमालिका ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र’ : देवपूजा – खंड ५

# पंचोपचार आणि षोडशोपचार पूजनामागील शास्त्र

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या**

**श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ आणि अन्य**




**सनातन संस्था**


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. ‘ईश्‍वरप्राप्तीसाठी कला’ याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. १.१२.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २१५ अन् अन्य ९२७ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी !

सद्‌गुरु (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्‌गुरु (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्‌गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना ‘श्रीसत्‌शक्ति’ आणि सद्‌गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना ‘श्रीचित्‌शक्ति’ या उपाधीने संबोधले जात आहे. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ (M.Sc.) यांचा परिचय



सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. त्यांना सहस्रो पाने सूक्ष्मातील ज्ञान मिळाले आहे. हिंदु राष्ट्रासाठी नाडीभविष्यात महर्षींनी सांगितल्याप्रमाणे देवदर्शन आणि संतांचे संघटन यांसाठी त्या अखंड भारतभ्रमण करतात.

---

## अनुक्रमणिका


卐 मनोगत ७

卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ९

**प्रकरण १ : देवपूजेची सर्वसाधारण माहिती** ११

१. व्याख्या २. निर्मिती ११

३. महत्त्व ४. प्रकार १२

५. काही देवतांच्या पूजनाची वैशिष्ट्ये व त्यांमागील कारण १४

६. देवपूजा दिवसात किती वेळा व कोणत्या समयी करावी ? १६

७. देवपूजा कधी करू नये ? १७

८. देवपूजा कोणत्या दिशेला करावी ? ९. देवपूजा कोणी करावी ? १८

१०. देवपूजा करतांना भाव कसा ठेवावा ? २१

**प्रकरण २ : पंचोपचार पूजन – कृती आणि शास्त्र** २३

१. पंचोपचार पूजनाची कृती २३

२. पंचोपचार पूजनातील कृतींमागील शास्त्र ३०

३. पंचोपचारांचे तुलनात्मक महत्त्व व त्यांचे परिणाम ६८

४. देवपूजेत गंध, पुष्प, धूप, दीप व नैवेद्य हे पाच उपचार असतांना अक्षताही का वहातात ? ६८

**प्रकरण ३ : षोडशोपचार पूजन – कृती आणि शास्त्र** ७०

१. षोडशोपचार पूजनाची कृती ७०

२. षोडशोपचार पूजनातील कृतींमागील शास्त्र ७५

३. षोडशोपचार व पंचोपचार पूजा ८४

४. षोडशोपचार पूजेतील सोळा उपचारांचे तुलनात्मक महत्त्व, परिणाम व वैशिष्ट्ये ८५

**प्रकरण ४ : देवपूजा झाल्यानंतर करावयाच्या कृती आणि त्यांमागील शास्त्र** ८९

**प्रकरण ५ : अन्य माहिती** ९५

१. देवघरात छोट्या तांब्यात पाणी भरून ते दुसऱ्या दिवशी प्यावे, हे तत्त्वतः योग्य असले, तरी कलियुगासाठी अयोग्य असणे ९५

२. मानसपूजा ९५

३. देवपूजेची मर्यादा व जलद ईश्वरप्राप्तीसाठी पुढील टप्प्याची साधना आवश्यक ९७

४. देवतांचे विडंबन रोखणे, ही काळानुसार आवश्यक उपासना ! ९८

卐 **प्रस्तुत ग्रंथाच्या विषयासंबंधी सखोल ज्ञान** १००

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** १०४

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## मनोगत

हिंदु धर्मातील सगुण उपासनापद्धतीचा पाया म्हणजे 'देवपूजा'. 'नित्याच्या धावपळीच्या दिनक्रमात देवपूजेसाठी एवढा वेळ आहे कोणाला ?', अशी नकारात्मक मानसिकता हल्ली बऱ्याच जणांमध्ये आढळते. केवळ एक नित्यकर्म पार पाडायचे म्हणून देवावर भरभर पाणी घालून गंधाचा टिळा लावायचा व कोणतेतरी फूल वाहून उदबत्तीने ओवाळायचे आणि 'देवपूजा झाली', अशी स्वतःची समजूत करून घ्यायची, असे चित्र आज दिसून येते. सर्वांच्या पालनपोषणाची काळजी वहाणाऱ्या भगवंताची पूजा अशा प्रकारे 'उरकणे', याला देवपूजा म्हणता येईल का ? असे केल्यावर भगवंताने आपल्यावर कृपा तरी का करावी ? घरी येणाऱ्या अतिथीचे स्वागत जसे आपण आदरपूर्वक करतो, तसेच देवाचे केले, म्हणजेच देवाची यथासांग पूजा केली, तरच तो आपल्यावर प्रसन्न होऊन आपल्याला भरभरून आशीर्वाद देतो. यासाठीच धर्मशास्त्रात देवाचे आवाहन करणे, त्याला बसण्यासाठी आसन देणे, त्याला चरण धुण्यासाठी पाणी देणे यांसारखे क्रमवार सोळा उपचार शिकवून त्या माध्यमातून विधीवत भावपूर्ण धर्माचरण करण्यास शिकवले आहे. १६ उपचारांपैकी पुढील उपचार – ९. गंध लावणे, १०. फूल वाहणे, ११. धूप ओवाळणे, १२. दीप ओवाळणे व १३. नैवेद्य दाखवणे, या पाच उपचारांना 'पंचोपचार' असे म्हणतात. सोळा उपचारांद्वारे देवपूजा करणे शक्य नसल्यास पाच उपचारांनी केली तरी चालते. बऱ्याच जणांना षोडशोपचारे पूजा करणे शक्य होत नसल्याने त्यांना पंचोपचार पूजेची माहिती पहाणे सोपे जावे, यासाठी ग्रंथात आधी पंचोपचार व नंतर षोडशोपचार पूजनाची माहिती दिली आहे.

आपल्या त्रिकालदर्शी ऋषीमुनींनी धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे देवपूजा केल्यासच त्यांच्या संकल्पशक्तीचा आपल्याला लाभ मिळतो. देवपूजा धर्मशास्त्रानुसार करतांनाच भक्तीभावासह करणेही तितकेच महत्त्वाचे असते. देवपूजेत भगवंताविषयीच्या प्रेमाचा, भावाचा ओलावा नसेल, तर ती पूजा भगवंतापर्यंत पोचत पोहोचत नाही; कारण भगवंत भावाचा भुकेला आहे. सर्वसामान्य भाविकात भाव अकस्मात निर्माण होणे

कठीण असते; पण देवपूजेतील विविध कृतींमागील शास्त्र समजून घेतल्यास देवपूजेविषयी, पर्यायाने देवाविषयी श्रद्धा निर्माण होऊन त्याचे रूपांतर भावात व्हायला साहाय्य होते. यासाठी ग्रंथात प्रामुख्याने देवपूजेतील कृतींमागील अध्यात्मशास्त्र सांगण्यावर भर दिला आहे.

देवतेचे आवाहन करतांना मूर्तीवर अक्षता किंवा तुळशीदल का वहावे, अर्घ्य देतांना पाण्याबरोबर गंध, पुष्प व अक्षता का वहातात, देवाला अभिषेक करतांना सुगंधी द्रव्याचा वापर का करावा, देवाला गंध लावल्यानंतर हळद-कुंकू का वहावे, देवाला नैवेद्य दाखवतांना नैवेद्याचे पान कसे ठेवावे इत्यादी अनेक प्रश्नांची बुद्धीपलीकडील शास्त्रीय उत्तरे या ग्रंथात दिली आहेत. त्याचबरोबर कोणत्या देवतेला कोणती फुले वहावीत, देवतांना फुले वहातांना ती विशिष्ट संख्येत व रचनेत वहाण्यामागचे शास्त्र काय, देवतेला किती उदबत्त्यांनी ओवाळावे यांसारख्या नाविन्यपूर्ण ज्ञानाचाही समावेश ग्रंथात केला आहे.

धार्मिक विधींत असलेली इतकी शास्त्रशुद्ध गहनता हिंदु धर्माशिवाय अन्य कोणत्याही पंथात नाही. यावरूनच हिंदु धर्माचे निर्विवाद श्रेष्ठत्व लक्षात येते.

ग्रंथात दिलेले शास्त्र समजून घेऊन त्यानुसार सर्वांकडून देवपूजा भावपूर्णरीत्या घडो व त्याद्वारे त्यांना अधिकाधिक ईश्वराचा कृपाप्रसाद लाभो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## प्रस्तुत ग्रंथातील धार्मिक कृती ऋग्वेदीय धर्मग्रंथांनुसार आहेत !

प्रस्तुत ग्रंथात दिलेल्या धार्मिक कृती विशेषतः ऋग्वेदीय धर्मग्रंथांनुसार आहेत. विविध प्रांतांमध्ये अन्य वेदांनुसार असलेल्या धर्मग्रंथांनुसार धार्मिक कृती प्रचलित असू शकतात. असे असले, तरी प्रस्तुत ग्रंथानुसार आचरण करणाऱ्यास धर्मशास्त्राप्रमाणे त्याचे फळ मिळणारच आहे. तरी वाचकांनी प्रस्तुत ग्रंथानुसार किंवा आपापल्या प्रांतानुसार धार्मिक कृती कराव्यात.